**सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नावः | – | शिवाजी नाथा दहातोंडे, |
| वय | – | ४२ वर्षे, व्यवसाय–शेती, |
| राहणार | – | चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर. |

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे यांचे मार्फत सुरुः–**

१. फिर्यादी ज्ञानदेव दहातोंडे आणि आरोपी क्र.१ व २ यांना मी ओळखतो. ते माझे शेजारी आहेत. त्यांच्यामध्ये कधी, कोठे व काय घटना घडली होती हे मला माहित नाही. आरोपी क्र.१ व २ यांनी लाकडी काठीने फिर्यादीला मारहाण केल्याचे मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९/१०/२०२० रोजी दुपारी ०२.०० च्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर घटना घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी घरी होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ फिर्यादीच्या घरासमोर येवून त्यांनी मागील भांडणाच्या कारणावरुन फिर्यादीला शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने लाकडी काठीने फिर्यादीच्या डाव्या पायावर, डाव्या कंबरेवर मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ यांनी विष्णु दहातोंडे याच्या तोंडात मारुन त्याचे कपडे फाडले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी विष्णुला शिवीगाळ केली होती. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मी विहिरीत उडी घेवून तुझे नाव घेईन तसेच घरात जाळुन घेईन अशी धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांचे भांडण सोडवले होते.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. बी. एस. गरड यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**सही/-**

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक-१८/०१/२०२४. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

नेवासा